वर्ष ४२ अंक ५

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web www.bmmonline.or

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मे २०२२

अध्यक्षीय

नमस्कार,

नास्ति मातृसमा छाया, नास्ति मातृसमा गतिः।
नास्ति मातृसमं त्राणं, नास्ति मातृसमा प्रिया ॥

मंडळी, आईचं आपल्या आयुष्यातलं स्थान वेगळं सांगायची गरजच नाही. तिच्या अखंड ऋणात आपण असतोच. परंतु कधीकधी ही भावना शब्दांत तिच्यापर्यंत पोहोचवावीशी वाटतेच. त्याचप्रमाणे, आपल्या मातृभूमीचेही ऋण शब्दातीत आहे. आपल्या अस्तित्वाला एक ओळख देणारी, इथे दूरवर आपल्याला एका धाग्यात बांधून ठेवणारी आपली मातृभूमी तिचाही जन्मदिवस अर्थात महाराष्ट्र दिन.

मदर्स डे आणि महाराष्ट्र दिनाच्या तुम्हा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.

आपल्याला एका धाग्यात बांधून ठेवणारे हे मराठीपण बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने अधिकच पक्के होणार आहे. हे अधिवेशन आता अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे. त्यानिमित्ताने अनेक महाराष्ट्र मंडळांशी संपर्क साधता आला. त्या सगळ्यांमध्ये अधिवेशनाविषयी असलेला उत्साह पाहून आमचाही उत्साह द्विगुणित झाला.

सर्वप्रथम 'अश्रूंची झाली फुले' च्या निमित्ताने डेट्रॉइटला भेट दिली. हेमा राचमाळे यांचे आतिथ्यशील घर, सुग्रास भोजन आणि जोडीला सुप्रसिद्ध मराठी नाटक. रसिक मराठी मनाला आणखीन काय हवे! अंजली अंतुरकर, किरण इंगळे, हर्षद आन्निगेरी,अनघा हुपरीकर, नितीन अंतुरकर.. अशा जुन्या मित्रांच्या भेटी, किस्से, कहाण्या आणि मग रात्री दोन वाजता जेवणावर मारलेला ताव. केवळ अविस्मरणीय! मनोज पाटील यांचे संपूर्ण नियोजन कौतुकास्पदच.

बॉस्टन, फिलाडेल्फिया आणि न्यू जर्सी येथील भेटींचा अनुभवही मस्त होता. बॉस्टन, येथील शिल्पा कुलकर्णीच्या आतिथ्याने अगदी 'माहेरपण' अनुभवले. कोरोनानंतर पहिल्यांदाच प्रत्यक्ष रीतीने झालेले हळदीकुंकू, शोभायात्रा असे सगळे कार्यक्रम पाहता आले. बृ. म. मंडळ अधिवेशनाचे निमंत्रणही सगळ्यांनी मनापासून स्वीकारले. धन्यवाद स्वाती शिंदे आणि शिल्पा कुलकर्णी.

त्यानंतर फिलाडेल्फिया मराठी मंडळाची ५० वर्ष साजरी करण्यासाठी आम्ही फिलीला कूच केली. अतिशय सुबक आणि देखणे नियोजन. प्रत्येक गोष्टीचा बारकाईने केलेला विचार वाखणण्याजोगा होता. आशिष नाडकर्णी, सचिन प्रभुदेसाई आणि सर्वच आयोजकांचे आभार. येथेही अधिवेशनाच्या निमंत्रणाला चांगला प्रतिसाद मिळाला.

अतुल आठवले आणि आरती देवधर आठवले यांच्यासोबतचा न्यू जर्सीला परतीचा मजेदार प्रवास, माझी शाळा मैत्रीण पूजा शिरोडकरशी झालेली भेट, अमर आणि रश्मी मुंगळे उन्हेकर यांचा पाहूणचार...खरंतर हे दिवस संपूच नये असे वाटावे अशी जिव्हाळ्याची माणसं यानिमित्ताने जोडली गेली आहेत. वर्षा आणि प्रशांत कोल्हटकर यांचे न्यू जर्सी येथील घर तर जणू माझे दुसरे घर झाले आहे. या सगळ्यांचा निरोप घेऊन नव्या उत्साहाने आपल्या कामाला लागले.

आपले नैमित्तिक कार्यक्रम 'मानसिक स्वास्थ्य','लेखक तुमच्या भेटीला' आणि 'बीएमएम करॉके' नेहमीप्रमाणेच या महिन्यातही उत्साहात पार पडले. आनंदाची गोष्ट म्हणजे बृ.म. मंडळ जागतिकीकरणांतर्गत नायजेरिया मराठी मंडळ आपल्याशी जोडले गेले आहे. असाच एकएक धागा जोडत संस्कृतीचे महावस्त्र विणले जावे.

मंडळी, तुम्हा सर्वांचे प्रोत्साहन आणि शुभेच्छांमुळे जे काही काम आजवर केले त्याची सुंदर पावती मिळाली आहे. २०२२चा साधनाताई आमटे पुरस्कार मला मिळाला आहे. माननीय मुख्यामंत्र्यांच्या हस्ते सत्कार, मानपत्र आणि रोख पंचवीस हजार रुपये हे या पुरस्काराचं स्वरूप आहे. एका थोर सेवाव्रतींच्या नावाने मिळणारा हा पुरस्कार जेवढा आनंददायक आहे तेवढाच जबाबदारीची जाणीव करून देणाराही आहे. या बहुमानाला साजेसे कार्य माझ्या हातून घडो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

जगात कुठेही असलो तरी आपल्या मराठी मातीसाठी अखंड कार्य करीत राहण्याचा निश्चय महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने करूया. जयहिंद ! जय महाराष्ट्र !!

आपली नम्र

सौ. विद्या रवींद्र जोशी (अध्यक्षा, बृ.म.मंडळ, उत्तर अमेरिका)

बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना 1981 (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
संपादक: -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-
BMM Treasurer - Sona Bhide
3574 S. Marion Way, Chandler, AZ 85286
Ph- (480) 812-9511 (PST) Email- sona.bhide@bmmonline.org
वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription
जाहिरातींचे दर
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text File**सह ईमेलने पाठवावा.
प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)
मताधिकार असलेले सदस्य

अध्यक्ष:-	विद्या जोशी	शिकागो, इलिनॉय
सचिव:-	कोमल चौक्कर	लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया
कोषाध्यक्ष:-	सोना भिडे	फिनिक्स, ॲरिझोना
सदस्य:-	मिलिंद बावडेकर	ॲटलांटा, जॉर्जिया
	संदीप बेलखोडे	ऑस्टिन, टेक्सास
	संदीप दीक्षित	क्लिवलँड ओहायो
	शिल्पा कुलकर्णी	बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्
	हेमा राचमाळे	डेट्रॉइट, मिशिगन

नियुक्त सदस्य

माजी अध्यक्ष:- अविनाश पाध्ये, बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स्

वृत्त संपादक:- विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

विश्वस्त समिती:

अध्यक्ष :- मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

सदस्य :- नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

सदस्य :- सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...

प्रकाशक:- बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
संकेतस्थळ:- https://www.bmmonline.org

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-

vinata@gmail.com or vinatak.bmmvrutta@gmail.com

Address: 3251 Thunderbird Court (E) Aurora IL, 60503

या अंकात...

	पान क्र.
- अध्यक्षीय	१
- लेखक तुमच्या भेटीला	२
- वाचकांच्या प्रतिक्रिया	
- बृ.म. मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता	३-४
- BMM दीपस्तंभ	५
- बृ.म. मंडळ अधिवेशनातील उद्योजकांचे कक्ष	६
- महाराष्ट्र मंडळ- बे एरिया- वार्ता	
- फिलाडेल्फिया मराठी मंडळाच्या पन्नाशीचा सोहळा	७
- उत्तररंग	८
- उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकांसाठी एकता-अक्षयभाषा कथास्पर्धा	
- लेख :- दोन सुलट दोन उलट	९
- कविता:- 'मातृधर्म'- (छायाचित्र आणि शब्दचित्र)	१०
- Matrimonial and Business Advertisements	११-१२
-पुरवणी ई विभाग:- कविता- 'ती'	१४
कविता- 'स्टेटस'	१५
- BMM YuvaVani - May 2022 (18 Pages)	
- राशिभविष्य:- मे, २०२२- (१६ पाने)	

'लेखक तुमच्या भेटीला' Live & Recorded

भाग २०:- Live- एप्रिल १६, २०२२ सकाळी **११** (**CT**)
लेखक:- An energetic Middle Schooler -
ऋचा सपाटे (सॅन होसे)
प्रकाशित पुस्तक-The Mystery of Candyland
संवादक:- विनता कुलकर्णी (शिकागो)
Recorded event - Click - **BMM YouTube Or visit:-**
https://www.youtube.com/watch?v=mw3YGVxMUS4&t=69s

वाचकांच्या प्रतिक्रिया

About Articles in April 2022 BMM Vrutta :-
Congratulations to Maya Burhanpurkar for her achievements. Amazing girl ! Proud of her.
Also liked the article by Minal Dhamankar about

'Son'- flower.

- ***Madhuri Bapat*** *(Phoenix, Arizona)*

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन, न्यू जर्सी (ऑगस्ट ११-१४, २०२२)

- प्रशांत कोल्हटकर (न्यू जर्सी), बृ. म. मंडळ अधिवेशन २०२२, संयोजक



नमस्कार मंडळी,

बीएमएम २०२२ मधे होणाऱ्या अधिवेशनाच्या तयारीचा पुढील आढावा घेऊन मी पुन्हा तुमच्यासमोर आलो आहे.

जसजसे अधिवेशन जवळ येत चालला आहे तसतसे केवळ न्यू जर्सीमध्येच नव्हे तर संपूर्ण उत्तर अमेरिकेत अधिवेशनासाठी उत्साह आणि उत्कंठा वाढत चाललेली आहे. बीएमएम २०२२ अधिवेशनासाठी सुरू असलेल्या तयारीबद्दल आम्हाला संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समुदायाकडून ठोस पाठिंबा आणि प्रोत्साहन मिळत आहे आणि समुदाय अधिक अपडेट्स ऐकण्यासाठी उत्सुक आहे.

विविध समित्यांचे अनेक नियोजित उपक्रम अंमलबजावणीच्या टप्प्यात येऊ लागले आहेत. कार्यक्रम निश्चित झाले आहेत, व्हिसा याचिका मंजूर होत आहेत. फूड मेनू आणि फूड लॉजिस्टिक मिश्चित झाले आहे. युवापिढी आणि लहान मुलांसाठी ॲक्टिव्हिटी लाइन अप निश्चित करण्यात आली आहे. उपस्थितांचे स्वागत कसे करायचे याची तयारी जोरात चालू आहे, जेणेकरून हे अधिवेशन सर्वांसाठी एक सुखद आणि अद्भुत अनुभव असेल.

विविध स्पर्धांचे आता दुसऱ्या फेरीत मूल्यांकन सुरू झाले आहे. मागच्या महिन्यातच आम्ही ढोल ताशा स्पर्धेची घोषणा केली आणि आम्हाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, आम्हाला उत्तर अमेरिकेतून बरेच ढोल ताशा पथक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. त्याबरोबरच आम्ही फोटोग्राफी आणि ड्रॉइंग स्पर्धा जाहीर केल्या आहेत.

गेल्या काही आठवड्यात बीएमएम टीमने विविध मंडळांना भेटी दिल्या आणि विविध मराठी मंडळांच्या गुढीपाडव्याच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. संपूर्ण उत्तर अमेरिकेतील मराठी समुदायापर्यंत पोहोचणे आणि त्यांच्याशी संपर्क साधणे आणि त्यांना संमेलनास उपस्थित राहण्याचे वैयक्तिक निमंत्रण देणे हा या भेटीचा एकमेव उद्देश होता. आम्ही डेट्रॉईट, अल्बानी, न्यू इंग्लंड, डेलावेअर आणि फिलाडेल्फिया मंडळांना भेट दिली. (**त्यातील काही क्षणचित्रे पुढील पानावर.**)

फिलाडेल्फिया मंडळाने ५० वर्षे पूर्ण केल्याबद्दल उत्तर अमेरिकेतील संपूर्ण समुदायाच्या वतीने मी अभिनंदन करतो.

आमची सिल्व्हर पॅकेजेस आणि बँक्वेट डिनर साठी तिकिटे यांची विक्री झाली आहे. जर तुम्ही मुख्य अधिवेशनासाठी नोंदणी केली असेल आणि आमच्या डे 0 इव्हेंटसाठी (CME, उत्तररंग, बिझनेस कॉन्फरन्स किंवा होलिस्टिक वेलनेस फोरम) नोंदणी करायला विसरला असाल, तर ती विक्री संपायच्या आत तुम्ही नोंदणी करू शकता.

अधिक माहितीसाठी https://bmm2022.org संकेतस्थळाला नक्की भेट द्या.

आमची अधिवेशनाची सर्व तयारी अंतिम टप्यात आहे आणि ती पुढच्या काही आठवड्यात पूर्ण होतील, आम्ही न्यू जर्सीकर तुमच्या स्वागत साठी उत्सुक आहोत आणि ११ ते १४ ऑगस्ट दरम्यान अटलांटिक सिटीमध्ये तुमच्या सर्वांचे मोकळ्या मनाने स्वागत करू पाहत आहे.

जसा प्रत्येक उगवता दिवस आशा-अपेक्षांची, स्वप्नांची नवकिरण घेऊन अवतरतो त्याचप्रमाणे प्रत्येक महिना आपल्या बीएमएम २०२२ च्या अधिवेशनाकडच्या वाटचालीचे अनेक पल्ले यशस्वीपणे पार करून आगेकूच करतो आहे, कार्यकर्त्यांची उमेद व्दिगुणित करतो आहे आणि त्याचा आढावा घेऊन मी परत पुढच्या महिन्यात तुमच्यासमोर येईन.

चला तर मग आता तुमचा इथेच निरोप घेतो. Welcome to BMM 2022 !

***

May 8, 2022

बृहन्महाराष्ट्र वृत्त पुरवणी - ऑनलाईन

- कविता:- ती - पान क्र. १४ **प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)
- कविता:- स्टेटस - पान क्र. १५ **शिल्पा कुलकर्णी** (लुईव्हिल, केंटकी)
वाचण्यासाठी संकेतस्थळ:-
https://bmmonline.org/vrutta-supplements/
- BMM Yuva-Vani:-May 2022 Click:
https://bmmonline.org/yuva-vani-archives/ or Click Here
- राशिभविष्य:- मे २०२२ - दादा दामले (न्यू जर्सी)
Click:- https://bmmonline.org/rashi-bhavishya/

बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन ऑगस्ट २०२२ च्या निमित्ताने कार्यरत अनेकांपैकी... खालील छायाचित्रांमधे काही कार्यकारिणी सदस्य व स्वयंसेवक

BMM दीपस्तंभ

- **सुशांत खोपकर** (डेट्रॉइट, मिशिगन)

बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळ (बृ. म. मंडळ-BMM) ही खरं तर उत्तर अमेरिकेतल्या मराठी माणसांनी, मराठी माणसांसाठी तयार केलेली संस्था आहे. यात आपल्या संस्कृतीचे, आपुलकीचे, बांधिलकीचे सगळेच पैलू अपेक्षित आहेत. पण "BMM म्हणजे केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम" असा बऱ्याच लोकांचा समज असतो. याच समजुतीला छेद देणारा एक प्रकल्प BMM ने २०२० साली सुरू केला आणि या प्रकल्पाचं नाव आहे, 'दीपस्तंभ'.

मार्च २०२०मध्ये अमेरिकेत कोविडने थैमान घालायला सुरुवात केली आणि अमेरिकेबरोबरच जगातल्या अनेक देशांची त्याने पाचावर धारण बसवली! कोट्यावधी लोकांना या विषाणूची लागण व्हायला आणि हजारो-लाखो जण मृत्युमुखी पडायला सुरुवात झाली. जीवनावश्यक गोष्टींची टंचाई निर्माण झाली. हँड सॅनिटाइझर्स, मास्क, मिळेनासे झाले. वर्क फ्रॉम होम, झूम मीटिंग्ज् सुरू झाल्या. जगभरातील सप्लाय चेन्स धडपडू लागल्या. या सगळ्याचा मोठा फटका बसला तो विद्यार्थ्यांना आणि ज्येष्ठ नागरिकांना. अशावेळी गरजू मराठी आणि इतर भारतीय बांधवांना 'दीपस्तंभ' या प्रकल्पातून मदत करायला पुढे सरसावल्या दोन धाडसी स्त्रिया- डेट्रॉइट मराठी मंडळातील बृ. म. मंडळ प्रतिनिधी व कार्यकारिणी सदस्य **हेमा राचमाळे** आणि बृ. म. मंडळ अध्यक्ष **विद्या जोशी**!

या प्रकल्पातून केलेली मदत विविध स्वरूपाची होती. भारतातून इकडे शिकायला आलेल्या विद्यार्थ्यांकडे सुरुवातीला शक्यतो गाडी नसते. त्यांना लॉकडाऊनच्या काळात ग्रोसरी पुरवण्यात आली. अगदी नुकत्याच आलेल्या विद्यार्थ्यांना तर त्या काळात विमानतळावरून आणायलाही कुणी नव्हतं. तेव्हा त्यांना 'दीपस्तंभ'च्या स्वयंसेवकांनी लागेल ती माहिती पुरवली. यासाठी त्या-त्या शहरातल्या मराठी मंडळांची मदत घेतली गेली.

काही मुलांचे आईवडील लॉकडाऊनमुळे अमेरिकेतच अडकून होते. त्यांना औषधांसाठी प्रिस्क्रिप्शन्स द्यायला कुणी नव्हतं. इकडे मिळणारी औषधे त्यांना परवडत नव्हती. अशा परिस्थितीत काही डॉक्टर स्वयंसेवकांनी प्रिस्क्रिप्शन्स देऊन 'दीपस्तंभ'च्या कार्यकर्त्यांनी भारतातून औषधे पाठवायची सोय करून दिली.

अमेरिकन सिटिझन्ससाठी मधल्या काळात भारताचा दहा वर्षांचा multiple entries चा व्हिसा काही काळापुरता बंद ठेवण्यात आला होता. अशावेळी भारतात कुणाची प्रकृती गंभीर झाली, अथवा कुणी वारलं, तर त्यासाठी तीन दिवसांत इमर्जन्सी व्हिसा मिळायचा. पण तो मिळवण्याची प्रक्रिया सोपी नव्हती. अनेक कागदपत्रं लागायची. बऱ्याच लोकांना ते लवकर करणं जमत नव्हतं. अशावेळी 'दीपस्तंभ' मदतीस आला आणि बृ.म.मंडळाने बऱ्याच लोकांना हा व्हिसा मिळवून द्यायला मदत केली.

इतकंच नव्हे तर याहीपुढे जाऊन अमेरिकेत ज्यांचा दुर्दैवाने मृत्यू झाला होता, त्यांचा पार्थिव देह भारतात पोहचवायलाही 'दीपस्तंभ' ने मदत केली. मधल्या काळात जेव्हा प्रवास संपूर्णपणे बंद होता, तेव्हा काही जणांचे अंतिम विधी इथे अमेरिकेत करावे लागले. त्यांच्यासाठी झूमद्वारा अंतिम संस्कारांना उपस्थित राहण्याची सोय केली गेली होती. 'दीपस्तंभ'ने मराठी मंडळांच्या सहाय्याने हे पुण्यकर्म केलं. असे प्रसंग अचानक येऊ शकतात. तरीही रात्री उशिरा किंवा अगदी भर पहाटे 'दीपस्तंभ'च्या कार्यकर्त्यांनी गरजूंना मदत पुरवली.

अगदी लहानपणापासूनच गरजूंना मदत करण्याचा हेमा राचमाळे यांचा स्वभाव आहे. त्यांनी आणि विद्या जोशी यांनी मनापासून घेतलेल्या कष्टांची परिणती म्हणजेच बृ .म. मंडळाचा प्रकल्प- 'दीपस्तंभ'! आत्तापर्यंत या प्रकल्पामधून ६००+ विद्यार्थ्यांना आणि १०००+ ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यात आली आहे. सामाजिक बांधिलकी म्हणून खरं तर हा प्रकल्प सुरू झाला होता. कोविड महामारीमुळे याला गती येऊन यावर भरपूर काम केलं गेलं आणि बघता बघता याचा आवाका विस्तारत गेला. मराठी बांधवांना मदत करायला जगावर संकट यायची गरज नसते. 'दीपस्तंभ' प्रकल्प पुढेही चालू ठेवायचा मानस असल्याचं हेमा राचमाळे यांनी सांगितलं. तुम्हाला कसलीही मदत लागली, मग ती वैयक्तिक असो, शैक्षणिक असो, वैद्यकीय असो, इमिग्रेशन, संदर्भात असो, विमा संदर्भात असो, ज्येष्ठ नागरिकांसाठी असो, विद्यार्थ्यांसाठी असो अथवा लहान मुलांसाठी असो, तुम्ही हेमा राचमाळे (फोन क्र.:- 313-215-1640, ईमेल पत्ता:- hema.rachmale@bmmonline.org) अथवा विद्या जोशी (फोन क्र.:- 224-321-2948, ईमेल पत्ता:- vidya.joshi@bmmonline.org) यांच्याशी संपर्क साधू शकता. बृहन्महाराष्ट्र मंडळ तुमच्या पाठीशी उभं आहे!

प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक वादळं येतात. ज्यांवर शक्यतो आपण स्वत:च्या हिंमतीवर किंवा आप्तस्वकीयांच्या मदतीमुळे मात करत असतो. पण काही वादळांवर मात करण्यासाठी 'दीपस्तंभ'ची मदत घेणे योग्य ठरेल. बृ.म.मंडळाचा 'दीपस्तंभ' आपल्याला दिशा दाखवायला, मदत करायला असल्यामुळे आपला प्रवास अधिक सुखकर होईल, हे आपण ध्यानात ठेवूया आणि इतका चांगला प्रकल्प सुरू केल्याबद्दल बृहन्महाराष्ट्र मंडळाचे ऋणी राहूया!

***

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातील उद्योजकांचे कक्ष

- मोहन रानडे (फिलाडेल्फिया)

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन म्हटलं की, महाराष्ट्र आणि उत्तर अमेरिकेतील कलाकारांचे विविध मराठी करमणुकीचे कार्यक्रम, अस्सल मराठी जेवण, मित्रांच्या गाठीभेटी याचबरोबर मराठी पुस्तकांपासून, मराठी संगीताच्या सीडी, मराठी स्त्रियांसाठी कपडे व पैठणी, दागिने, अनेक प्रकारच्या भेटवस्तू, खाद्यपदार्थ अशा वस्तूंची खरेदीची संधी याची प्रकर्षाने आठवण होते. अटलांटिक सिटी येथे ११ ते १४ ऑगस्ट रोजी भरणारे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पुढील अधिवेशन अशाच विक्री-कक्षांची तयारी उत्साहात करीत आहे.

१९९३ सालच्या बाल्टिमोर अधिवेशनात अशा प्रकारचे विक्री-दालन प्रथम मोठ्या प्रमाणात सुरू झाले. तेव्हांपासून ही प्रथा कॅलगरीचे अधिवेशन वगळता दर अधिवेशनात नियमित चालू आहे. अमेरिकेतील आणि भारतातील उद्योजकांचा प्रतिसाद दर अधिवेशनात वाढत चालला आहे.

अमेरिकेतील लहान शहरातून राहणाऱ्या मराठी समाजास त्यांच्या जवळपास अशा वस्तू सहज मिळतातच असे नाही. त्यामुळे या मंडळींना खरेदी करण्यास संधी मिळते आणि उद्योजकांना नवीन ग्राहक मिळतात अशा दोन्ही हेतूंनी हे विक्री कक्ष लोकप्रिय झाले आहेत. दर अधिवेशनाला महाराष्ट्रातून नियमित येणाऱ्या उद्योजकांची त्यामुळे वाढ झाल्याचे सहज नजरेत भरते.

सर्वात लहान कक्ष १० फूट बाय १० फूट आकाराचा असून त्यात सहा बाय अडीच फुटाचे एक टेबल दोन खुर्च्या, विद्युत जोडणी आणि उद्योगाचा दोन फूट बाय सहा इंच आकाराचा नाम-फलक एवढ्या सोयी मिळतात. हे सोडून इतर गोष्टी हव्या असल्या तर त्या अधिक आकार देऊन मिळू शकतात. सध्या प्रत्येक कक्षाचा दर १७५० डॉलर्स एवढा आहे. विना नफा तत्त्वाच्या संस्थांसाठी दर १५०० डॉलर्स आहे. कक्ष नोंदणी करण्यासाठी संकेतस्थळ:-
https://bmm2022.org/expo-registration/

अधिवेशनाच्या प्रांगणात जेवणाची जागा आणि प्रमुख कार्यक्रमाचे सभागृह यामध्ये हे कक्ष असतील ज्यायोगे सर्व उद्योजकांना ग्राहकांशी संपर्क साधणे सोपे जाईल. कक्षांची रचना अशी केली जाईल की, कुठेही रांगा न लागता एकदा कक्षांच्या क्षेत्रात पोचलात की सर्व कक्ष दिसू शकतील. उदयोजक कक्षांच्या मध्यवर्ती जागेत एक व्यासपीठ उभारून उद्योजकांना त्या जागेचा वापर त्यांच्या मालाची जाहिरात करण्यास देण्याचा विचार आहे. सर्व उद्योजकांना अधिवेशन काळात मदत करण्यास अधिवेशन समितीमधील कार्यकर्ते नेमले जातील. महाराष्ट्रातून येणाऱ्या उद्योजकांस व्हिसा मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तत्परतेने पुरविली जातील. अधिक माहितीसाठी उद्योजक कक्ष प्रमुख राहुल पवार यांचेशी संपर्क साधावा
pawarrahul@yahoo.com +१ ७३२ ६१० ३६३३

आत्तापर्यंत ५८ कक्षांपैकी ३६ कक्षांची नोंदणी झाली आहे. तेंव्हा त्वरा करा आणि आपला कक्ष आजच नोंदवा.

***

महाराष्ट्र मंडळ बे एरिया-वार्ता



- माधव देशपांडे (सदस्य, महाराष्ट्र मंडळ बे एरिया)

मार्च १२, १३ आणि २० रोजी बे एरिया महाराष्ट्र मंडळाने दिग्पाल लांजेकर यांनी दिग्दर्शित केलेला 'पावनखिंड' हा सिनेमा माऊंटन व्ह्यू मधील ICON थिएटरमध्ये कॅलिफोर्नियातल्या सर्वात मोठ्या पडद्यावर दणकेबाज आवाजात दाखविला.

सिनेमाच्या मध्यंतरात प्रेक्षकांसमोर शिवाजी महाराज, संभाजी महाराज, मावळे, भगवा ध्वज, व स्पार्टन ढोल ताशा पथकाने येऊन सर्वांचा उत्साह वाढविला. हे सर्व प्रेक्षकांसाठी अनपेक्षित आणि आश्चर्यकारक होते.

"जय भवानी", "जय शिवाजी" आणि "छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो" अशा घोषणांनी प्रेक्षागृह दुमदुमले. प्रत्येक वेळी ३०० प्रेक्षक उपस्थित होते.

***

फिलाडेल्फिया मंडळाच्या पन्नाशीचा सोहळा

- **क्रांती गोडबोले** (फिलाडेल्फिया)

फिलाडेल्फिया मराठी मंडळाचा ५० वर्षे पूर्ण झाल्याचा सोहळा नुकताच एप्रिल ९ आणि १० या दिवशी झोकात पार पडला. प्रथम ऑडिओ-व्हिज्युअलच्या मार्फत अनेक मंडळींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. त्यात मोहन रानडे, डॉ मीना नेरुरकर, मुकुंद कुटे, आशिष नाडकर्णी, सचिन प्रभुदेसाई, तुषार वेदांती, विक्रांत कांबळे, यांनी आठवणी सांगितल्या. डॉ मीना नेरुरकर यांनी फिलाडेल्फियातील महिलांना घेऊन बसवलेल्या "लेडीज स्पेशल" या कार्यक्रमाने दिवसाची सुरुवात झाली. त्या नंतर "इये फिलिचिये नगरी" हा मुलाखतींचा कार्यक्रम डॉ देवेंन गबाले यांनी गप्पांच्या मार्फत हसत खेळत सांभाळला.

फिलाडेल्फिया मराठी मंडळाचा पाया घातला गेला तो साधारण १९७१ साली! आपल्या मातीची, संस्कृतीची ओढ आणि अमेरिकेत मराठी कार्यक्रमाचा अभाव लक्षात घेऊन सर्वांनी या कार्यास सुरुवात केली. त्या पिढीचे साक्षीदार श्री मोहन रानडे यांनी १९७४ मध्ये मंडळाचा कार्यकारिणीवर येऊन मदत करण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या आठवणी सांगितल्या. त्या काळात कार्यरत असलेल्या मंडळींची नावे नमूद करत, नाट्यप्रेमी मंडळींमुळे मिळालेल्या संधीचे कसे सोने केले हेही सांगितले. अनेक कलाकारांना आमंत्रण देऊन आपल्या घरी त्यांचा पाहुणचार करण्यात ते व त्यांची पत्नी समिता यांची आजतागायत ख्याती आहे. त्यांच्या स्वभावातला मराठी बाणा व दडलेला कलाकार सगळ्यांना पहायला मिळाला. सतत नवनिर्मिती करत राहा आणि जुन्या नव्याचा तोल सांभाळा असा त्यांनी संदेश दिला.

त्यानंतर रौप्यमहोत्सवी वर्षाचे मंडळाचे अध्यक्ष श्री संतोष कोल्हटकर यांनी फिलाडेल्फियाच्या प्रेमाखातर सॅन फ्रान्सिस्को वरून येऊन आपल्या आठवणी सांगितल्या. त्यांनी मंडळाच्या कार्यकारिणीवर असताना सातत्याने काम करत जास्तीत जास्त लोक जमा होतील असे प्रयत्न केले. लोक वेळेवर यावेत आणि कार्यक्रमांमध्ये सगळ्यांना भरपूर खायला मिळावे असा पुणेरी कटाक्ष ठेऊन त्याची सोय केली. फिलाडेल्फियाला येणाऱ्या मंडळींना चांगली फाय स्टार ट्रीटमेंट दिली जाते अशा आश्वासनावर अनेक कलाकारांना भारतातून येथे आणून त्या काळी कार्यक्रम सादर केले. नावात आणि चेहऱ्यावर संतोष अशी त्यांची थोडक्यात ओळख. या प्रसंगीही इथे त्यांना फाय स्टार ट्रीटमेंट मिळाली. मंडळाच्या या सोहळ्यात माणसांची चांगली पारख असलेली व्यक्ती श्री रत्नपारखी यांचीही आठवण काढली गेली.

नंतरच्या काळात कामगिरी केली ती फिलाडेल्फियाचे व्यक्ती, वल्ली आणि चक्रवर्ती मुकुंद कुटे यांनी. बालपण विदर्भात गेले. वडील पोस्टमास्तर असल्याने सतत बदली! त्यामुळे स्वभावातच दर वेळी नवीन ओळखी काढणे, वाढवणे आणि सेवेचे महत्त्व लहानपणापासून भिनलेले! फिलाडेल्फियाचा कॅनव्हास मोठा केला पाहिजे या विचारातून त्यांनी दहा दिवसांचा गणपती-उत्सव सुरू केला. लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यात ते गर्क असताना घरची धुरा मात्र त्यांच्या पत्नीने-नीलिमाने सांभाळली. प्रत्येक पुरुषाच्या मागे स्त्रीच्या मदतीचा हात नक्की असतो याला दुजोरा मिळाला. मराठी माणूस जास्तीत जास्त प्रमाणात बिझनेस मध्ये उतरावा, जॉब क्रिएशनला प्राधान्य द्यावे, स्टेट रिप्रेझेंटेटिव्ह ऑफिसेस जागी आपला मराठी माणूस असावा असं त्यांना वाटतं.

त्यानंतर सर्व महिलावर्गाची प्रतिनिधी आणि मंडळाची विश्वस्त समिती सदस्य म्हणून कोमल दाते यांच्याशी गप्पा झाल्या. त्यांनीही कार्यकारिणीवर असताना हळदीकुंकू, लेझीम असे नवीन उपक्रम सुरू केले. मैत्रिणींना बरोबर घेऊन एखादी स्त्री अनेक बाजूंचा विचार करून मल्टिटास्किंग करू शकते आणि सगळ्यांना सामावून घेऊ शकते हे अनेकींनी वेळोवेळी या फिलाडेल्फिया मंडळात दाखवून दिले आहे. डेकोरेशन कमिटीने आपला ठसा उमटवून सर्व जागी सुंदर मनमोहक सजावट केली होती. तसेच येणाऱ्या प्रत्येकाला पिशवीमध्ये भेटवस्तू देण्यासाठी रजिस्ट्रेशन कमिटी सज्ज होती. आता मराठी माणूस म्हटला की, अस्सल मराठमोळ्या जेवणाशिवाय आपले पान हलत नाही. मोजकेच पण चवदार पदार्थ आणि भरपूर आग्रह या प्रकारे अधिवेशन चांगली करता येतात हे दाखवून दिले. अनेक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन खूप छान काम केले होते त्यामुळे सगळ्यांना सकाळच्या न्याहरी पासून दुपारच्या आणि संध्याकाळच्या मस्त जेवणाचा आस्वाद घेता आला. "उभ्या उभ्या विनोद" या कार्यक्रमात इथे वाढलेल्या मुलांनी सादर केलेला हास्यविनोदात दोन पिढ्यांचा मिलाप अगदी चपखल दिसून आला. घरोघरी मातीच्या चुली हे जाणून आईवडिलांवर केलेले विनोद आणि टोले सर्वांनी मजेत खपवून घेतले. भारतातून दौऱ्यावर आलेले "अश्रूंची झाली फुले" या नाटकाने सर्वांना मंत्रमुग्ध करून टाकले. दुसऱ्या दिवशी संगीतमय वातावरणात "वारी पंढरीची" सादर झाली. खरोखर वारीत सहभागी झाल्याचा अनुभव सर्वांना मिळाला. प्रत्यक्ष पालखी आणि वारीत मंत्रमुग्ध होत सर्वांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. त्यानंतर "सीक्रेट" नाटकाच्या टीमने नवीन गंभीर विषयाला हात घालून गमतीदार हलकंफुलकं नाटक सादर करून मजा आणली. शेवटी "रेट्रो ते मेट्रो" या गाण्याच्या प्रोग्राममध्ये सगळ्यांनीच ताल धरला व एकत्र गाणी ऐकण्यात आणि नाचण्यात वेळ घालवला. या दोन दिवसांचा हा आखीव-रेखीव उत्सव नेत्रदीपक पद्धतीने साजरा झाला.

वंदुनी त्या गजानना, 'लेडीज स्पेशल' झालं शनिवारी
इये फिलीचीये नगरी, हास्य विनोद झाला पोटभरी
'अश्रूंची झाली फुले', हे नाटक होते फारच भारी
मग सर्वांनी साजरी केली, ती पंढरीची वारी
मागोमाग 'सीक्रेट' आणि 'रेट्रो ते मेट्रो'ची उंच भरारी
एप्रिल नऊ आणि दहा २०२२ या दोन वारी
केली फिलाडेल्फिया मंडळाची पन्नाशी साजरी !

***

उत्तररंग

एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||
चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||

बृ.म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
संदीप दीक्षित बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
फोन क्र. 1-216-926-6696 **ईमेल** sandeep.dixit@bmmonline.org
विद्या जोशी - अध्यक्षा, बृ. म. मंडळ
फोन क्र. 1-224-321-2948 ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

.....

एप्रिल - मे २०२२ महिन्यातील आयोजित कार्यक्रम

३० एप्रिल – महाराष्ट्र दिन

मराठा तितुका 'मेळवावा' 'महा-राष्ट्र' धर्म वाढवावा

वक्ते - पराग टोपे, किरण केतकर
गायक - अजित दिवेकर / सुनीता घाटे
- हिंदवी स्वराज्य: शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली अटकेपार फडकला भगवा ध्वज
- स्वदेशी ते स्वराज्य - भारताचा ३५० वर्षांचा रोमहर्षक स्वातंत्र्य लढा, बलिदान, असामान्य स्वार्थत्याग
- पुढची भरारी - हिंदवी स्वराज्यावर आधारित महा-राष्ट्राची उभारणी

७ मे - Atomic Policies of the World

वक्ते - **सुधीर काळे**
"पाकिस्तानी अणुबॉम्ब: एक घोर फसवणूक
मराठी संक्षिप्त रूपांतर, मूळ पुस्तक: Deception: Pakistan, the United States, the secret trades in nuclear weapons
- पाकिस्तानचे अण्वस्त्र सज्ज देशात झालेले परिवर्तन
- डॉ खान आणि पाकिस्तानी व अमेरिकन सरकारांनी केलेली जगाची फसवणूक
- अमेरिकेच्या कट्टर शत्रूंना पाकिस्तानने केलेली तंत्रज्ञानाची विक्री
- मुशर्रफ हुकूमशाही, अमेरिकेविरुध्द छुप्या कारवाया

१४ मे - अपूर्ण राहिलेली स्वप्नं

वक्ते - **अविनाश पटवर्धन, चंद्र रानडे, प्रताप देशमुख, चंद्रशेखर मोघे, गोविंद मोदी**
- स्वप्नांच्या निर्मितीवर परिणाम करणारे घटक
- स्वप्नांचे प्रकार
- स्वप्ने चिरडणारे घटक
- अपूर्ण स्वप्नांचा जीवनशैलीवर होणारा परिणाम

२१ मे - गुंतवणुकीची मूलभूत तत्त्वे, भाग १

वक्ते - **विश्वनाथ होत्रया**
गुंतवणुकीचे प्रकार:-
- मूलभूत/ Fundamental
- तांत्रिक/ Technical
- भावनिक/ Sentimental
- परिमाणवाचक/ Quantitative

आर्थिक साधने/ Financial Instruments (स्टॉक्स, बॉंड्स, फ्युचर्स, म्युच्युअल फंड, ईटीएफ, फॉरेक्स/चलन पर्याय)

टीप: - *गेली दोन वर्षे चालू असलेल्या बृ. म. मंडळ- उत्तररंग सत्रांमध्ये २५ जून २०२२ रोजी, १००वे सत्र साजरे करणार आहे.*

***

उत्तर अमेरिकेतील मराठी लेखकांसाठी कथा स्पर्धा
एकता फाऊंडेशन
अक्षय भाषा
|| जतन भाषेचे, रक्षण संस्कृतीचे ||

सहर्ष घोषणा

एकता-अक्षयभाषा कथास्पर्धा वर्ष तिसरे

कथा स्पर्धेचे नियम खालीलप्रमाणे-

१. कथास्पर्धा प्रवेश विनामूल्य आहे. कथा पाठवण्याची अंतिम तारीख - **चार जुलै २०२२.**
२. केवळ उत्तर अमेरिकेतील रहिवाश्यांसाठी ही स्पर्धा मर्यादित आहे.
३. स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली आहे. मात्र एका स्पर्धकास एकच कथा पाठवता येईल.
४. स्पर्धेला विषयाचे बंधन नाही, मात्र शक्यतो उत्तर अमेरिकेतल्या आयुष्याशी संबंधित विषयातील कथा असाव्यात.
५. कथा मराठी भाषेतील, संपूर्णपणे स्वतःची असावी तसेच ही कथा फेसबुक किंवा इतर सोशल मीडिया वर किंवा मासिकांत प्रसिद्ध झालेली नसावी.
६. कथेची शब्दमर्यादा १,५००-२,५०० असावी.
७. कथा पाठवण्यासाठी व इतर संपर्कासाठी- akshaykathaspardha@gmail.com.
८. **कथा Google इनपुट साधने (किंवा इतर मराठी ऑनलाईन एडिटर यांचा वापर करून) फक्त Mangal Font मध्येच लिहिलेली असावी आणि Microsoft Word Document या स्वरुपातच पाठवावी.**
९. कथेसोबत पूर्ण नाव, पत्ता, इमेल आणि फोन नंबर ही माहिती **केवळ** इमेलवर पाठवावी.
१०. **कथेच्या पहिल्या किंवा इतर कुठल्याही पानावर लेखकासंबंधी माहिती नसावी. तशी आढळल्यास कथा दुरुस्तीसाठी परत पाठवली जाईल.**
सारांश - कथा मंगल फॉन्ट, वर्ड डॉक्युमेंटमध्ये कुठलंही ओळखचिन्ह न ठेवता पाठवावी.
११. निकाल जाहीर होण्याची तारीख- पंधरा ऑगस्ट २०२२.
१२. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१३. पहिल्या तीन विजेत्या कथांना $३००, $२००, $१०० अशी पारितोषिके दिली जातील.
१४. पारितोषिक प्राप्त आणि काही उल्लेखनीय कथा अक्षयभाषेच्या वेबसाईटवर तसेच इ -बुकात प्रसिद्ध केल्या जातील.

टीप: ***ही माहिती जास्तीतजास्त लेखकांपर्यंत पोचण्यासाठी तुमच्या फेसबुक पेजवर पोस्ट केलीत आणि WhatsApp वर मित्रमैत्रिणींना पाठवलीत तर आभारी राहू. धन्यवाद !***

***

दोन सुलट दोन उलट

घर छोडे जात जुलाहो!

- विद्युल्लेखा अकलूजकर (व्हँकूव्हर, कॅनडा)

काही दिवसांपूर्वी माझी मैत्रीण सॅली म्हणाली, की तिच्या शेजारणीला, यिव्हॉनला, एका पडायला आलेल्या घरातल्या अनाथ झालेल्या कुंड्या हव्या होत्या, आणि त्या घरात आता बरेच दिवस कोणी राहात नाही, तेव्हा आपण आज संध्याकाळी तिला त्या कुंड्या उचलून आणायला मदत करायला गाडी घेऊन जाणार आहोत. हे घर नेमकं कुठेसं आहे, तेही सॅलीने मला सांगितलं. ते माझ्या रोजच्या फिरायला जाण्याच्या रस्त्यावर जवळच होतं.

अलिकडे आमच्या एके काळच्या शांत, निवांत आणि कमी लोकसंख्येच्या शहरात मोठ्या आवारात बांधलेली लहानशी टुमदार घरं पाडून सगळी जागा राहायला वापरण्याची, म्हणजेच एका घराच्या जमिनीत सहा टाउनहाउसेस बांधण्याची, किंवा अपार्टमेंट कॉम्प्लेक्स बांधून काढण्याची महान लाट आलेली आहे. बहुधा अशा वेळी त्या घरांची बिचारी पोरकी झालेली बाग नष्टच केली जाते. कित्येक झाडे झुडपे विनाशी रोलरखाली चिरडून जातात. म्हणून आमच्यासारखे काही वेडपट त्या झाडांना जगवण्यासाठी तिथून उचलून दुसरीकडे नेऊन रोवतात आणि त्यातल्या त्यात निसर्गाला राखतात.

त्याच उद्देशाने काही दिवस गेल्यावर, आणि यिव्हॉनला तिथल्या कुंड्या मिळाल्याचे कळल्यावर, मी प्रथम चालतचालत ते घर आणि बाग पाहायला गेले, आणि एके काळच्या राहत्या घराची सध्याची दुरवस्था पाहून हैराण झाले. जेव्हा अनेक महिन्यांपूर्वीच हे लोक घर सोडून गेले होते, तेव्हादेखील मी त्या घरातली दोनतीन मांजरं घराच्या आवारात बापुडवाणी होऊन पेंगत बसलेली पाहिली होती. पण आता तर ती मांजरंदेखील कुठे दिसत नव्हती, बहुधा भुकेपायी त्यांनी दुसरा घरोबा केला असावा. एके काळच्या चांगल्या जोपासलेल्या बागेत आता सर्वत्र काटेरी ब्लॅकबेरीच्या झुडपांनी जागा व्यापलीच होती. घराच्या दाराला लाकडी फळकूट बसवून घट्ट केलेले होते. घराच्या पुढ्यात एक मिस्टर लिंकन जातीचा छाटलेला गुलाब त्याच्या लेबलासह दीनवाणा होऊन नुसता उभा होता. आणि घराच्या मागच्या बाजूला जुने टायर्स, मोडका पाणी घालायचा हिरवा होज, आणि काही रिकाम्या कुंड्या पडल्या होत्या. काही कुंड्या फुटक्याच होत्या. त्यांचा काही उपयोग नव्हताच. पण काही उचलून आणता आल्या असत्या.

पाहणी करीतकरीत मी जेव्हा घराच्या मागील बाजूला त्यांच्या गराजमधे गेले, तेव्हा दोनतीन खोकी तिथे बंद करून ठेवलेली दिसली. खोक्यात काय आहे ते पाहिले तर त्यांत बऱ्याचशा रंगीबेरंगी लोकरींचे गुंडे आणि काही विणलेले कपडे दिसले. एकात बरीचशी पेपरबॅक पुस्तकेही होती. दोनचार खेळणीही पडलेली होती. पण या खोक्यांच्या आजुबाजूसही कोळिष्टके होती. म्हणजे या खोक्यांची विल्हेवाट लावण्याआधीच कित्येक महिने या लोकांनी घर सोडून दिलेले होते, आणि आता हे कोणाच्याही साठी राखून ठेवलेले नव्हते. गराजमध्ये काही ठिकाणी इथल्या रोजच्या पावसामुळे गळती लागलेली दिसत होती. म्हणजे ही खोकी जर इथेच राहिली, तर ती पावसात नक्कीच खराब झाली असती. घर एकदोन दिवसात नक्कीच पडेल, अशी मोठ्ठी पाटीहि तिथे डिव्हेलपर्सनी लावलेली होती.

"बिनु जिव्है गुण गाइया, बिनु बस्ती का गेह!" हे कबिराचे शब्द मला ते सुनेसुने झालेले घर पाहताना सहजच आठवले. "सूने घर का पाहुना, तासों लायो नेह!" अशा शून्य मनोवस्थेत मी तिथे काही वेळ घालवला. नंतर मी पुन्हा घरी आले, आणि विचार करून, वेळ मिळतांच संध्याकाळी माझ्या गाडीची ट्रंक साफ करून पुन्हा रेस्क्यू ऑपरेशनसाठी त्या घराच्या ड्राइव्हवेमध्ये माझी गाडी नेऊन लावली. तीन धडधाकट कुंड्या माझ्या ट्रंकमध्ये घातल्या. फावडं नेलंच होतं, ते वापरून त्या अनाथ गुलाबाला जमिनीतून खणून काढून तोही एका कुंडीत घालून गाडीत रिचवला. तीन्ही खोकीही गाडीत घातली, आणि घराच्या वास्तुपुरुषाला नमन करून "जगत में जीवन दो दिन का" हे कठोर सत्य स्मरत घरी आले.

त्या गुलाबाला नीट छाटून माझ्या बागेत एका जागी तात्पुरते लावून ठेवले. कुंड्यांना पाण्याने धुवून काढून नीट साफ केले आणि एक मोठी कुंडी स्वत:पुरती ठेवून बाकीच्यांमधे माझ्या बागेतली पेरेनियल रोपट्यांची बाळे लावून त्या आमच्या रिचमंड गार्डन क्लबच्या वार्षिक फंडरेझिंग सेलसाठी दान करायला तयार करून बागेतच ठेवल्या. दरवर्षी आमच्या बागांतून अशी घरी वाढवलेली रोपटी तयार करून आम्ही क्लबाला देतो, क्लब ती मातीमोलाने तीन तासात नेहमीच्या बचतवादी गिऱ्हाइकांना विकतो, आणि या एका दिवसाच्या सेलमधून मिळणारे पैसे आमचा गार्डन क्लब विद्यापीठात बागकाम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्यायला आणि आम्हाला झाडाझुडपांबद्दल ज्ञान देणाऱ्या ज्ञानी वक्त्यांना मानधन म्हणून वापरतो. गेली दोन वर्षे हा आमचा परोपकारी सेल कोविडच्या साथीपायी झालेला नाही, पण या वर्षी तो होईल, असे सध्या तरी वाटते आहे. सेल आहे मदर्स डे च्या सप्ताहान्ती, सात मे'ला. पण त्याआधीदेखील क्रेग्जलिस्टमधली माझी पेरेनियल्सबद्दलची जाहिरात पाहून काही बागकामप्रेमी लोक माझ्या घरी येऊन रोपटी घेऊन जातातच. तसा एकजण येऊन इतर झुडपांबरोबर तो 'मिस्टर लिंकन' नामक गुलाबही घेऊन गेला. त्याचे पैसे गार्डन क्लबाला द्यायला मी बाजूला काढून ठेवले. निसर्गाचे ऋण चुकवण्याचा थोडाफार प्रयत्न सफळ झाला.

बाकी खोकी जी आणली होती, त्यांना घरात न आणतां गराजमधेच काही दिवस ठेवून तपासून मग ते पेपरबॅक पुस्तकांचे खोके, आणि दोनचार चांगली खेळणी जी सापडली होती, त्यांना तत्काळ व्हॅल्यू व्हिलेज या थ्रिफ्ट स्टोअरला नेऊन दिले. आणि बाकी दोन खोक्यांतली लोकर, विणकाम वगैरे हळूहळू बाहेर काढून निरखले. त्या घरातली बाई विणकर असली पाहिजे. तिने एका खोक्यात जवळजवळ

पुरे करीत आणलेले दोनचार स्कार्फ ठेवले होते. एक होता तांबडा/काळा गार्टर स्टिचवाला, आणि एक क्रोशाने विणलेला पांढरा, पिवळा, पिस्ता रंगाचा. आणखी एक पांढऱ्या आणि काळ्या सुती धाग्यांनी विणलेला फिंगरलेस ग्लव्हचा जोड अर्धवट विणून सुईसह गुपचाप पडलेला दिसला. मी हे सर्व प्रकार विणलेले आहेत. त्यामुळे त्या उद्योगी विणकर बाईच्या अधुऱ्या राहिलेल्या विणकामाकडे पाहताना मला पुन्हापुन्हा घर सोडून जात असलेल्या विणकराबद्दलचे कबिराचे अनेक शब्द आठवत राहिले. "घर छोडे जात जुलाहो" यात जुलाहा म्हणजे जीवात्मा. पण जुलाहा हा विणकराबद्दलचा शब्द कबिराने कधी आत्म्याला तर कधी परमात्म्यालाही वापरलेला आहे. "अस जुलहा का मर्म न जाना। जिन जग आनि पसारिन ताना।।" या रमैनीमधे तो परमात्म्यालाही जुलाहा म्हणजे आपल्यासारखा विणकर मानतो. मग "भीगी पुरिया काम न आवै, जोलहा चला रिसाई" हेही आठवलं. भिजलेले विणकाम उपयोगाचे नसते. इथे आणून मी निदान त्या विणकामाला भिजून वाया जाण्यापासून तरी वाचवलं होतं. पण माझ्याच हाती हे तिचे विणकाम का यावे, या योगायोगाचेही आश्चर्य वाटत राहिले. मनातल्या मनात मी तिच्याशी बोलत राहिले. तिचे काही काम तरी मी पुरे करू शकेन असे तिला मी मनोमन सांगितले. पण काही लोकरीचे गुंडे, आणि काही अपुरे विणकाम जे मला जमणार नव्हते, ते पुन्हा उचलून मी दुसऱ्या एका थ्रिफ्ट स्टोअरमधे जिथे ते लोकरी वगैरे ठेवतात, तिथे नेऊन दिले. आणखी कोणीतरी त्याचा उपयोग करील.

बाकीचे स्कार्फ वगैरे गोष्टी पुऱ्या करून इथल्या फूड बँकेच्या बेघर लोकांना स्कार्फ पुरवण्याच्या प्रकल्पात दान कराव्या असे मी ठरवले. पण या विणकामाबरोबरच एका खोक्यात मला विणकाम करताना जवळ ठेवण्याचा एक छानसा हिरवा-काळा कापडी स्टॅण्डही मिळाला. झोपताना खालच्या मजल्यावरून वर जाताना विणकाम बरोबर न्यायला तो फारच सुटसुटीत आहे. तो इकडून तिकडे नेण्यासाठी त्याला पिशवीसारखे बंदही आहेत.

हा स्टॅण्ड मी त्या अज्ञात विणकरणीची आठवण म्हणून स्वत:च वापरायचा ठरवला. गेला आठवडाभर मी हे करते आहे. आणि ते करताना मनातल्या मनात माझेच शब्द म्हणते आहे,

लोकर संपते, विणणारी संपते,
विणलेले वस्त्र मागे उरते,
माया त्यातली याला त्याला
तिलादेखील ऊब पुरवते!

***

मातृधर्म (छायाचित्र आणि शब्दचित्र)

- विनता कुलकर्णी (शिकागो)

एकां तळ्यांकिनारी, बदकांची दिसे रांग
मातेसवे निघाली, पिल्ले निर्धास्त, गुंग

शिस्तीत उभी बाळे, आईच्या धाकात
शिकण्यांस उत्सुक सज्ज, जलभूमीत उद्योग

पिल्लांस माय सांगे, असावे सावधचित्त
चौफेर लक्ष द्यावे, भवसागर हा अथांग

बदक असो वा मानव, मातृधर्म जगीं समान
वात्सल्यसिंधु आई, जपतसे शैशवबाग !

***



Greetings ! 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.

You get a tax deduction and do not pay any commission.
You instruct and send, we deliver.
An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.

India recipients of your giving need not be a registered charity.

Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive. They do not even need tax exemption (80-G,FCRA).

FSC is the answer. For more detail. Visit our Website "WWW.SmallCharity.Org" Or Email to Admin@SmallCharity.Org

You will hear from:

Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801

Join Donor List

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA,MD
KIRAN & NANDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR & ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLKAR
KASI & GEETHA GABBITA
RAJESH & SUMANA RAO
RAMESH GAONKAR
CHANDRA VARIA
NATWARLAL & KALI RAMANI
BHANJI & MANSI KUNDARIA
JITU & KOKILA PADALIA
DALSUKH & ILA MADIA
HIMAT & MINA TANK
MUKESH & VIBHA SHAH
SUMANT SNEHALATA PANDYA
MOHAN & RAMA PATEL
JAYENDRA & SAROJ SHAH
GOVIND & BHAKTI NADKARNI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
MAHARSHI KARVE FOUNDATION 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. CT SCAN AHMADNAGAR MH
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S.SAMITI, PUNE,PATHAK TRUST
COSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESHWAR MAHILA MANDAL
NIH
SAFETY CLUB, HYDERABAD, A.P.
G.D.TRUST
FUJI MAMMOGRAPHY-M P SHAH MEDICAL COLLEGE, JAMNAGAR, GUJARAT
M P SHAH MEDICAL COLLEGE MAMMOGRAPHY EQUIPMENT GIVING 200 TESTS A WEEK (10,400 A YEAR) FOR WOMEN TOWARDS EARLY DETECTION AND INTERVENTION WHICH IS NOT AVAILABLE IN NEARBY HOSPITALS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
SHANTA DURGA TEMPLE, KAVLEM, GOA

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
3574 S. Marion Way
Chandler, AZ 85286

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

नाते जुळते मनाशी मनाचे

Reshimgathee

A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

१९८२-२०२२

नीलम ऑडिओ, फूड व गिफ्टस्

NEELAM AUDIO & VIDEO INC.

उत्तर अमेरिकेतील ग्राहकांची ४० वर्षे अखंड सेवा

आमचा इतिहास

१९९४ ते ९७, स्वरवेल भाग २, गाव मागेच राहिला, चंद्र उदायिनी वेळा, कॅसेटची आणि अजय चक्रवर्ती, रिना- राजीब सीडींची निर्मिती, 'लपंडाव' चित्रपटाने अमेरिकेत मराठी चित्रपट प्रदर्शनास सुरुवात

फिलाडेल्फियातील ४८ वर्षांच्या वास्तव्यानंतर आम्ही साऊथ जर्सीत स्थलांतर केले आहे. आमच्या नवीन पत्त्याची नोंद घ्या.

322 Hidden Acres Lane Moorestown NJ 08057

संपूर्ण कॅटलॉग www.neelam.com येथे पहा

+१ २६७ ९८१ ७१७० या क्रमांकावर whatsapp मेसेज पाठवून आपली ऑर्डर नोंदवा

बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

मे, २०२२

(बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-

ती

- **प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)

'ती'. 'ती' म्हणजे संपूर्ण, ह्या शब्दातच सगळं आलं. ह्या कवितेत आई आणि मुलीच्या नात्याचे वर्णन केले आहे. जेवढी ती मायाळू, सोशिक असू शकते, तेवढीच ती साहसी, परखडही असू शकते. तिच्यातून पुन्हा तीच जन्म घेते आणि ही साखळी अशीच अविरत सुरू राहते.... राहावी!

ती

ती..ती.. म्हणजे मीच...प्रत्येकात मी, आणी प्रत्येक...तीच

तिच्याच कुशीतून मी जन्म घेते; ती माझ्या पंखांना बळ देते
तिची अभिमानी, गर्व विरहित, शाश्वत, कणखर, नजर
प्रश्नांची यादी उत्तरासकट तयार करते !

मी पंखांनी स्वतःला उचलते, उडते, गगनात, आसमंतात
प्रगतीची नवी व्याख्या लिहिते
माझ्यात आहे तीच, श्वासाश्वासात, प्रत्येक पावलात, प्रत्येक विचारात ।

काळोख, अंधार, चढ, उतार तिला बघून डगमगतात
तिला मात्र ते कुठेच दिसत नाहीत
तिच्यातली मीही धडपडत उभी राहतेच; पडत नाही
पाडणाऱ्याचा दृष्टिकोन बदलायची नेहमीची सवय, तिचीच तर आहे, माझ्यात !

तिच्यातला आत्मविश्वास आभाळाला भिडणारा
मेहनत सुध्दा अवाक होईल अशी जिद्द माझ्या नसानसात

तोडीसतोड तिची माया, त्याग, आपुलकी
वारसाहक्कानी मीही शिंपडते, जिव्हाळा, प्रेम, माणुसकी !

तिच्यातली मी प्रत्येक वेळी अशीच बहरत राहते, उमलत राहते सदा
माझ्या कुशीतून पुन्हा ती जन्म घेते.
मोहरते, फुलते अखंड पुन्हा, पुन्हा !

***

स्टेटस

- **शिल्पा कुलकर्णी** (लुईव्हिल, केंटकी)

आपण सारेच याचा भाग आहोत. मीदेखील अपवाद नाही. 😊 तरीही जरा गंमत म्हणून लिहिलंय!

स्टेटस

हल्ली मी करते
स्टेटसची सफर
सर्व जग फिरते
घेते जरा खबर

खमंग पदार्थ
लोभस फुले
कधी वर्णन यथार्थ
कधी चेहरे फुललेले

कधी असते अनामिक
उदास वाणे काही
मन होते भावनिक
अन् वाटते काळजीही

कळत नाही हे सारे
स्वतःसाठी की दूजापायी
नवीन जगाचे वारे
माथाफोड कशापायी?

जो तो आपल्या दुनियेत
मस्त मशगुल आहे
एकमेकांच्या जगात डोकावत
आपणही स्वस्थ रहावे

पण...
स्टेटस पाहून माणूस
जाणण्याची येवो न कधी वेळ
एकमेकातील संवादास
आपल्याकडे असूदे पुरेसा वेळ !

***